**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन आदेश क्रमांकः बदली-२०१९/प्र.क्र.१६/१४-अ**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ३० मार्च, २०१९

## शासन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (४) व ४ (५) अनुसार खाली नमूद केलेल्या मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखकाची आंतरविभागीय बदली करण्यात येत असून, त्यांच्या नावासमोरील स्तंभ-५ मध्ये दर्शविलेल्या विभागात त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | श्री / श्रीमती | लिपिक-टंकलेखकाचे नांव | सध्याचा विभाग | बदलीनंतर पदस्थापनेचा विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री | अ.अ.दांडेकर | जलसंपदा विभाग | कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग |

२. बदली झालेल्या लिपिक-टंकलेखकास संबंधित विभागाने तत्काळ कार्यमुक्त करुन या विभागास कळवावे. तसेच बदली झालेल्या लिपिक-टंकलेखकाने त्यांची पदस्थापना केलेल्या विभागात तत्काळ रुजू व्हावे.

३. विभागाने बदली झालेल्या कर्मचाऱ्यास तत्काळ कार्यमुक्त न केल्यास शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१८६/१६/का.१४, दिनांक २३ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार सामान्य प्रशासन विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल यांची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. मंत्रालयीन विभागातील सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना राज्य प्रशिक्षण धोरणानुसार बदलीनंतरच्या प्रशिक्षणाची कार्यवाही करण्यासंदर्भात शासन परिपत्रक क्रमांक: कअनि १११६/ प्र.क्र.३२/१४-ब, दिनांक २३.०५.२०१६ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार विभागात बदलीने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यास बदलीनंतरचे प्रशिक्षण देण्याबाबतची कार्यवाही संबंधित मंत्रालयीन विभागांनी करावी.

५. श्री. दांडेकर, लिपिक-टंकलेखक यांच्या सेवा लोकसभा निवडणुक २०१९ करीता अधिग्रहीत करण्यात आल्या असल्यास त्यांनी प्रथमत: निवडणुक कामकाजासाठी विहीत केलेले कर्तव्य बजावणे आवश्यक राहील.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या [www.maharashtra.gov.in](http://www.maharashtra.gov.in) या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०३३०१७४००६१६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.03.30 17:42:59 +05'30'

**( ग.भि.गुरव )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

संबंधित लिपिक-टंकलेखक (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)

**प्रत,**

(संबंधित मंत्रालयीन विभागांमार्फत)

१. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (आस्थापना), जलसंपदा विभाग/ कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय
२. सह/उप सचिव (आस्थापना), जलसंपदा विभाग/ कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय
३. निवड नस्ती/संग्रहार्थ (कार्यासन १४-अ).